# निशाणी क्र. ८८ वरील आदेश

( मयत सुदाम तर्फे वारस व ईतर वि. पोपट व ईतर )

प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांच्या विरूध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावर वादींनी त्यांचे म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यास हरकत घेतली नाही. तसेच, प्रतिवादी क्र. ३ चे वारसांतर्फे म्हणणे सादर करून प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २, प्रतिवादी क्र. ३ च्या वारसांच्या विद्वान वकीलांचा व वादींच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद श्रवण केला.

४. याउलट, प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादींना उलटतपासाची संधी न दिल्यास त्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल. त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विरूध वादीचा उलट तपास न घेतल्यामुळे दिनांक ०७.०८.२०२४ रोजी आदेश पारित झालेला आहे. तसेच, प्रतिवादी क्र. ३ चे वारसांनी त्याच्या म्हणण्यात प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीचा दावा मान्य केलेला आहे. त्यामुळे, वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी संगनमताने अर्ज दिल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, वरील नमूद प्रतिवादींनी विहित वेळेमध्ये वादींचा उलटतपास घेतला नसल्याने निशाणी क्र. ८३ वरील दिनांक ०७.०८.२०२४ रोजीच्या

आदेशानुसार त्यांच्या विरूध्द ''उलटतपास नाही'', असा आदेश पारित करण्यात आलेला आहे. दाव्याचे स्वरूप व प्रस्तूत अर्जातील तथ्य विचारात घेता तसेच, नैसर्गिक न्याय तत्वानुसार उभय पक्षांना त्यांची बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. तसेच, प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरूद्ध खरेदीखत परत सोडवून/उलटून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी असल्याने दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागण्याच्या दृष्टीने प्रस्तूत अर्ज मंजुर करून सदर प्रतिवादींना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देणे योग्य व न्यायोचीत होईल. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो. .

**आदेश**

०१. अर्ज निशाणी क्र.८८ खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र. १ व २ यांना वादींचा उलट तपास घेण्याची परवानगी देवुन त्यांच्या विरूद्ध झालेला उलटतपास नाहीचा आदेश रक्कम रू.२००/– चा खर्च प्रतिवादी क्र. ३ चे वारसांना देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

०३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांच्या विरूध्द झालेला खर्च आज अथवा पुढील तारखेच्या आत प्रतिवादी क्र. ३ चे वारसांना द्यावा.

Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2025.02.24 17:05:35 +0530

दिनांकः २४/०२/२०२५. ( व्ही. व्ही. जोशी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जामखेड.